जैन फार्म फ्रेश फुडस प्रा.लि. साठी उर्ध्व वर्धा धरण जलाशयामधून औद्योगिक वापरासाठी पाणी आरक्षण मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक. बिसिंआ २०१७/(४४६/१७)/सिं.व्य.(धो)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२/०३/२०१८

<u>संदर्भ</u>: १) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर यांचे पत्र दि.२२/१२/२०१७
२)जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण १००१/(१५४/०१) सिंव्य(धो),दि.२१/१/२००३
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१३/(४१५/१३)/सिंव्य (धोरण) दि. १६/८/२०१४
४) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य (धोरण) दि. १७/११/२०१६
५) शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/१५)/सिंव्य (कामे) दि. १७/११/२०१६

प्रस्तावना :-

संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडून जैन फार्म फ्रेश फुडस प्रा.लि. शिरसोली,जि.जळगाव या कंपनीच्या संत्रा प्रक्रिया उद्योग व संशोधन केंद्र, दापोरी (ठाणाठुणी), तो.मोर्शी,जि.अमरावती यांना उर्ध्व वर्धा धरण जलाशयातून औद्योगिक पाणी वापराच्या प्रयोजनासाठी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी क्षेत्रिय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयाच्या परि.२.२ अन्वये मा.मंत्रीमंडळ उप समिती यांच्या मान्यतेने जैन फार्म फ्रेश फुडस प्रा.लि. यांना उर्ध्व वर्धा धरण जलाशयातून पाणी आरक्षणास देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

संस्थेचे नांव	पाणी वापराचा प्रकार	जलाशय/ कालवा/ नदीचे नांव	मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी)
१	२	३	४
जैन फार्म फ्रेश फुडस प्रा.लि. शिरसोली, जि.जळगाव यांचे अंतर्गत संत्रा प्रक्रिया उद्योग व संशोधन केंद्र, दापोरी (ठाणाठुणी), तो.मोर्शी,जि.अमरावती	औद्योगिक	उर्ध्व वर्धा धरण जलाशयातून	२.०१८

उपरोक्त नमूद प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २००८/(१३१/०८)/सिंव्य (धोरण), दि. ६/३/२००९ नुसार बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे झालेली सिंचनाची कपात भरुन काढयासाठी सिंचनाच्या पुर्नस्थापनेचा खर्च अद्यावत करुन काढावा व ती रक्कम करारनामा करण्यापूर्वी जमा करणे हे पाणी वापर संस्थेला बंधनकारक आहे.

२. बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी करारनाम्याचा सुधारीत नमुना व मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र. बिपापू १००१/(७१३/२००१)/सिंव्य(धो), मुंबई- ३२, दि. ७/४/२००३ अन्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार करारनामा करण्यात यावा.

३. शासन परिपत्रक क्र. पापव -२०१५/(प्र.क्र.४००/२०१५)/सिव्य (महसूल) दि.१५/१२/२०१५ अन्वये बिगरसिंचन पाणीवापराचे करारनामे करणे व नुतनीकरण वेळेवर करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपट्टी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे या विषयाबाबत शासन निर्णय क्र. पापव २०१५/(प्र.क्र.८८/२०१५)/सिंव्य (महसूल) दि. २१/४/२०१६ मधील अटींचे पालन करणे पाणी वापरकर्त्यांना बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(४०७/१०)/सिंव्य (धोरण), दि. २९/६/२०११ अन्वये करारनामा करताना बिगरसिंचन पाणीवापरकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्पाटप्पाने पाणीवापर करण्याचे नियोजन नमुद करु शकतील.

६. शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/२०१५)/सिंव्य (कामे), दि. १७/११/२०१६ अन्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करणे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देणेसाठीचा निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

७. म.ज.नि.प्रा. आदेश क्र. ९/२०१७, दिनांक २२/९/२०१७ मधील तरतुदीचे अनुपालन व पूर्तता केल्यावरच करारनामा करावा.

८. पर्यावरण विभागाचे Consent to establish प्रमाणपत्र संस्थेने सादर केल्यावर त्याचेशी सुसंगत तरतुदीनुसारच कार्यवाही करावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३२२१२५२४१२५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.03.22 12:54:30 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विराधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विराधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.

८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१० प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
१३. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग, अमरावती.
१५. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण)